**Estd 1962**
**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# २२/९/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या असून काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची पुनर्परीक्षा दि. १६ सप्टेंबर २०२१ पासून सुरु झाल्या आहेत. आज दि. २२ सप्टेंबर २०२१ रोजी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. आदी अभ्यासक्रमाच्या पुनर्परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

आजच्या पुनर्परीक्षेसाठी ११५१ विद्यार्थ्यापैकी ९०० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

आज दि.२२ सप्टेंबर २०२१ रोजी खालील एकुण २० परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले व आजपर्यंत एकुण २८९ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एम.एस.डब्ल्यू. सेमि. ३ व ४ | २ | बी.होक. – सस्टेनेबल अॅग्रीकल्चर मॅनेजमेंट सेमि.– १, २, ३ व ४ |
| ३ | बी.एस्सी. – अॅग्रीकल्चर –सेमि.– १, २, ३ व ४ | ४ | एम.बी.ए. (रुरल मॅनेजमेंट) – सेमि. ३ व ४ |
| ५ | बी.आर्किटेक्ट – सेमि. २ | ६ | एल.एल.एम. सेमि.–१, २, ३ व ४ |
| ७ | पी.जी.डिप्लोमा इन गांधीयन स्टडीज | ८ | एम.एस्सी. – एनव्हारमेंटल सायन्स – सेमि. ३ व ४ |

तसेच अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.